म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. २०४५
सन १८८२

...RESTING ... OF SADHU.

# चित्तवेधक साधुचरित्र

अथवा

सत्यनारायण कथेंतील साधूची कथा.

...हें पुस्तक
...कर वैद्य कंनडकर,
...णीं
...न पद्यें करून केलें

४८
काव्य

०७.८८ ४८
म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक | सन |
|---|---|---|
| काव्य | बा. हि. वैद्य | १८८२ |

संग्रहालय क्रमांक २०४५ / १ २०४५
पुस्तकाचें नांव चित्तवेधक साधु चरित्र.

# चित्तवेधक साधुचरित्र

अथवा

सत्यनारायण कथेंतील साधूची कथा.

हें पुस्तक

बाळकृष्ण दिनकर वैद्य कंनडकर

यांणीं

मूलाधारें नवीन पद्यें करून केलें

तें

दक्षिणा प्राईज कमेटीनें पसंत केल्यावरून

जनमनरंजनार्थ

मुंबईमध्यें,

"न्याशनल" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८७२ इ०.

( हें पुस्तक सन १८४७ चा आक्ट २० प्रमाणें नोंदून मालकानें सर्व हक्क आपले कडे ठेविला आहे. )

किंमत ६। आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० 29
ठाणें सन १८

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० ३५९
ठाणें सन १८०

# प्रस्तावना.

कोणत्याही भाषेची योग्यता वाढण्यास त्या भाषेंत ग्रंथविपुलता अवश्य असली पाहिजे; त्या वांचून ती विशेष महत्वास येणार नाहीं. संस्कृत, लॅटीन, अरबी, परशिअन इत्यादि भाषा विशेष महत्वास येण्यास तींत विद्वज्जनांनीं परिश्रम घेऊन अनेक प्रकारच्या विषयांवर अनेक ग्रंथ केले, हेंच मूळ कारण होय. कांहीं दिवसांपूर्वी इंग्रजी भाषा ही इतकी निकृष्ट दशेंत होती कीं, सभ्यलोक त्या भाषेंत बोलावयासही लाजत. परंतु ज्या वेळेस त्या भाषेंत बेकन, पोप, न्यूटन, शेक्स्पियर, बैरन, इत्यादि विद्वज्जनांनीं परिश्रम घेऊन पुष्कळ ग्रंथ केले, तेव्हां पासून तिचें महत्व वाढून दिवसानुदिवस ती अधीक उदयास आली; व तींत शेकडो ग्रंथ होऊं लागले. येणें करून ती विद्वज्जन ग्राह्य झाली, इतकेंच नाहीं, किंबहुना लॅटिन, संस्कृत, परशिअन, इत्यादि भाषेची बरोबरी करील अशा योग्यतेस आली आहे. अस्तु, याचप्रमाणें प्राकृत भाषा. ही कित्येक दिवसापूर्वीं अतिशय नीच स्थितींत होती. पुष्कळ विद्वान लोक हिचा अव्हेर करून गीर्वाण भाषेंत बोलत असत; परंतु मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, मोरोपंत, वामनपंडित, आदिकरून महान महान श्रेष्ठ कवींनीं हिचा अंगिकार करून ह्या भाषेंत पुष्कळ पद्यरूपी ग्रंथ करून लिहून ठेविले. अहाहा! परोपकारार्थ किती त्यांचे परिश्रम! त्यामुळें ही भाषा किती योग्यतेस

आली ! त्या वेळेस त्यांचा त्या स्तुत्य कृत्यास उत्तम प्रकारचा राजाश्रय मिळता, अगर प्रख्याति होण्यास आबांचा सारखे छापखाने असते, तर त्यांस किती अधीक उमेद आली असती ! असो परमेश्वर कृपेनें सद्यः मात्र बरींच साधनें अनुकूल आहेत; यानवरून ह्या भाषेचा चांगला ऊर्जितकाळ येईल असा रंग दिसत आहे. बहुत विद्वान लोक हींत गद्यरूपी देखील ग्रंथ लिहूं लागले, आणि दयाळु सरकार तर मोठ्या उदारपणें नवीन ग्रंथ करणारांस त्यांचा योग्यते प्रमाणें इनामें देत आहे, यामुळें दिवसानु दिवस अधिक उत्तेजन येऊन बरीच ग्रंथवृद्धि होऊं लागली आहे. असाच क्रम कांहीं दिवस चालल्यास खरोखर लौकरच ती संस्कृत भाषेच्या जवळ जवळ येऊन पोंहोंचेल. प्रस्तुत सरकारचे विद्यावृद्धि कडे पूर्ण लक्ष, आणि तेणें करून मनोरंजक, उपयुक्त व शास्त्रीय विषयांवर अनेक प्रकारचे ग्रंथ करण्याचा झटून चाललेला प्रयत्न, हें पाहून मजलाही एक लहानसें पुस्तक करण्याची उमेद आली.

हल्लीं हें जें मी अल्पमतीनें पुस्तक केलें आहे, हें विशेष महत्वाचें किंवा शास्त्रीय विषयांवर आहे असें नाहीं, परंतु ह्या लहानशा पुस्तकांत जी कथा घेतली आहे तींत जगंनियंत्या परमेश्वराची अघटित करणी व त्याचें भक्तवात्सल्य, आपत्कालीं सद्वर्तन रक्षिल्याचें फळ व पातिव्रत्य धर्माची योग्यता इत्यादि हितकर गोष्टी थोडक्यांत दृष्टांतरूपें चांगल्या दर्शविल्या आहेत. ही कथा मूळ संस्कृत भाषेंत स्कंद पुराणीं रेवाखंडीं आहे त्या आधारें केलेल्या "श्री सत्य नारायणकथेचा" पुस्तकावरून मीं प्राकृत भाषेंत पद्यरूप रचली.

हींत नानावृत्तांचे श्लोक, आर्या, साकी, दिंडी, पद, कटिबंध, ओवी व गीति इत्यादि अनेक प्रकारचीं पद्यें आहेत. ह्या कथेंत शोकरस प्रधान असून प्रसंगीं मध्यें मध्यें व शेवटीं आनंदही पुष्कळ आहे आणि स्वाभाविक कथा चमत्कारिक आहे तेणें करून वाचीत असतां पुढें काय आहे हें पाहण्या विषयीं अत्युत्कंठा प्राप्त होते. अस्तु, ही रचना करीत असतां प्राकृत भाषेचा धोरणानें व कोठें कोठें रसाचा पुष्टीकरणार्थ न्यूनाधिक करून वाढविलें आहे. तरी मूळांतील मार्मिक अर्थाकडे नजर देऊन प्राय: तो यथामति जितका राखवेल तितका राखिला आहे. माझा पद्य रचना करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे तरी सूज्ञ जनांनीं चुकांची क्षमा करून मजला दुसरें + + करण्या विषयीं उत्तेजन द्यावें; हीच प्रार्थना आहे. परमेश्वर कृपेनें सिद्धीस जावो.

या पुस्तकास दक्षिणा प्राईज कमेटी पुणें व श्रीमंत रा० रा० रघुनाथ राव विठ्ठल ऊर्फ अंणा साहेब उमदेतुल मुलुख बहादूर आणि बदलापूर येथील सावकार ओक यांणीं आश्रय दिला सबब मी त्यांचे आदर पूर्वक आभार मानितों.

**बाळकृष्ण दिनकर वैद्य कंनडकर.**
**हल्लीं वस्ती कल्याण.**



काव्य, ७००१

# अथ चित्तवेधक साधुचरित्र प्रारंभ.

## मंगलाचरण.

### श्लोक मंदाक्रांता.

श्रीविष्णूच्या, चरणकमला, वर्णुनी त्या दयाला[1] ॥
जेणें केलें, जगजनन हें, वंदितों मी तयाला ॥
जो विश्वाचा[2], लय करिल त्या, चिंतुनी शंकराला ॥
हेरंबा मी तुजाशीं नमितों जोडुनीयां कराला ॥ १ ॥

### आर्या.

विघ्नविनाश[3] कराया, तुजला अत्यंत दीनही नमती ॥
पाहुन तदीय[4] रीती, नमितों मी तुजशि दीन हीनमती[5] ॥२॥
आशिर्वचनोद्देशें[6], करितों भावें गुरूस नमनातें ॥
सर्वांस वंद्य जोतो, देइ कुबुद्धी कधींच न मनातें ॥ ३ ॥

### श्लोक उपजाति.

शृंगारदा जी कवितेस सारी ॥

---

१ हें श्रीविष्णूचें विशेषण. २ जगताचा. ३ विघ्नविनाशक राया असें संबोधन करावें अगर पदें निराळीं आहेत तसेंच करावें. ४ त्यांची. ५ मतीहीन (निर्बुद्ध.) ६ आशिर्वाद मिळावा या उद्देशानें.

यशार्थ दासांस पुढेंचि सारी ॥
ठेऊनियां भाव सरस्वतीतें ॥
नमीतसे, देइल ती मतीतें ॥ ४ ॥

## ओवी.

भावें शुद्ध करून मन ॥ देवादिकांतें केलें नमन ॥
कथा भागाचें करून मनन ॥ करितों निवेदन यथामति ॥५॥

## श्लोक मंदक्रांता.

स्वीकृत् केलें, कठिण समयीं, सद्व्रतातें जयोंने ॥
सद्भावातें, वसवुनि अशा, वाढतें तेज यानें ॥
त्याचें कीर्तीकथन परिसा, पूर्ण जें तें जयानें ॥
ज्याचें भक्तिश्रवण घडतां, सत्वरें तें जयानें ॥ ६ ॥

## श्लोक शार्दूल विक्रीडीत.

साधू नामक वाणि जो प्रियसखी लीलावती जी सती ॥
राहे रत्नपुरीं सुखेंयुत अशी इच्छा मनीं त्यास ती ॥
दावें विप्रजना करोनि पुजना द्रव्या अशी सन्मती ॥
याचें प्राक्तन हें विचित्राचि पहा कीं त्या नसे संतती ॥७॥

## साकी.

द्रव्याचें सुख मानाचें सुख परि नाहीं संतान ॥
उपाय नाना, नवसहि केले ऊरविले संतां न ॥ ८ ॥
नृत्यगीतही सुखदायक हे उपाय मन रमवाया ॥
करिती तेणें सुख व्हावें परि गेले सर्वहि वांया ॥ ९ ॥

---

१ सरसावी. २जानें. ३ प्रभाव. ४ श्रवणकरा ५जयाप्रत ने ह्मणजे नेतें. (अर्थात् जयप्राप्ती होते.) ६ सुखेंकरून युक्त.

त्रस्त मानसीं बहुदिन ऐसा कांता दुःखित भारी ॥
साधू संतां ह्मणती देतां संतति होउं अभारी ॥ १० ॥

**आर्या.**

कांता उद्विग्न मनीं, संततिवांचून जनन हें फुकट ॥
बोले करीन स्वार्थी–स्तव कोणी व्रत कथील जरि विकट॥११॥

**श्लोक कामदा.**

सर्वही सुखें भोगिलीं परी ॥ संतती विना शून्यमंदिरीं[1] ॥
दिनानिशीं मनीं त्रस्त फार हा॥ह्मणुनि विक्रया[2] चालिला पहा १२

**श्लोक यूथिका.**

चालतां शकुन हे बहु जाहले ॥
पूर्णकुंभ हय[3] चामर पाहिले ॥
सुरभि[4] वत्ससहीताहि देखिली ॥
तदुपरी तरणी[5] अवलोकिली ॥१३ ॥

**श्लोक दृतविलंबित.**

बसुनियां नवकेमधिं जेधवां ॥

---

१ "अपुत्रस्य ग्रहं शून्यं" तसेंच "ग्रह रत्नानि बालका' अतएव जा गृहांत बालक रत्नें नाहींत तें गृह ह्मणजे मंदीर, शून्य होय, त्यांत (शून्य मंदिरांत) २ व्यापारार्थ. ३ अश्व. (अश्व, चामर, गौ, पूर्ण कुंभ, स्त्री, इत्यादि वस्तु हिंदुशास्त्रांत शुभ शकुन मानिले आहेत. पुष्कळ भाविक लोकांची अशी समजूत आहे कीं, कोठें गमन करावयास निघालें असतां हे शकुन दृष्टीस पडले ह्मणजे लाभ होतो.) ४ गाय ५ नौका.

वणिज चालत पुढति तेधवां ॥
सुफल काल, समीपचि पातला ॥
नदितटीं जन[1]–संघ विलोकिला ॥ १४ ॥

**आर्या.**

या तीरीं वाद्यध्वनि, श्रवणीं पडतांचि नाविकां सांगे ॥
क्षणभरि स्वस्थ असावें, येतों पाहून काय हें आंगें ॥ १५ ॥

**श्लोक पृथ्वीछंद ( केकावली.)**

असें वदुनियां जनासमिप तत्तिरा पातला ॥
कळे न मज भाव हा ह्मणतसे खरा यांतला ॥
समूह जमला कशास न सुपेठ[2] यात्रा न वा ॥
प्रकार तरि काय हा मज कथा सुपात्रीं[3] नवा॥१६॥

**साकी.**

ऐसें पुसतां लोक सांगती व्रत करितो हा राजा ॥
उल्कामुख हें नाम ययाचें भद्राशिला सति भाजा[4] ॥ १७ ॥
स्वसुखें भूपति समीप जा प्रतिबंध नसे कोणाला ॥
प्रसाद भक्षुनि आनंदानें जावें स्वस्थानाला ॥१८॥

**ओवी.**

ऐसी ऐकून जनवाणी ॥ पुढती चाले साधूवाणी ॥
जेथें भूप विष्णूचरणीं ॥ लीन त्या स्थानीं पातला ॥ १९ ॥
भूपें चालविलें पूजन ॥ तंव साधूनें केलें वंदन ॥

---

१ जन समाज. २ उतम प्रकारचा बाजार. ३ जो ज्या-विषयीं विशेष आर्त आहे त्यास देण्याविषयीं तो सुपात्र होय. (सुपात्र हें मज याचें विशेषण. ) ४ स्त्री.

 काा'य २८

तयास राजानें दिधलें आसन ॥ नामाभिधान पूसिलें ॥२०॥
तेणें आपुलें नामाभिधान ॥ रायासि आदरें कथन करून ॥
ह्मणें रंगलें माझें मन ॥ पृच्छा[1] श्रवण करावी ॥ २१ ॥

**आर्या.**

कोण व्रत? केंवि विधी[2]? सद्भावानें किमर्थ आचारिता? ॥
फल काय? इष्टदैवत कथन करा मजशि सर्व तच्चरिता २२
विनया[3]न्वितोक्ति परिसुनि, साधूची हूंप[4] भूपती पुरवी ॥
नुरवी[5] तत्कांक्षेतें, जेंवि तमातें प्रकाशतांचि रवी ॥ २३ ॥

**श्लोक अनुष्टुप.**

सुखार्थ करितों मी हें ॥ सत्यनारायण व्रत ॥
उल्कामुख ह्मणे साधो ॥ श्री विष्णू इष्टदैवत ॥२४॥

**श्लोक वंसततिलका.**

जो नारदा व्रत[6]विधी कथि चक्रपाणी ॥
तो भूपती कथित ऐकत साधु वाणी ॥
जी ऐकतां करिल साच फल श्रुतीला ॥
आनंदयुक्त परिसाच फलश्रुतीला ॥ २५ ॥

**आर्या.**

भक्तीनें व्रत करितां, फल यापरि दे अचँक्षु[7]ला नयन ॥

---

१ प्रश्न. २ प्रकार. ३ प्रार्थनापूर्वक भाषण. ४ आशा. ५ न उरवी ६ हा प्रकार असा कीं, निशामुखाचें ठायीं सत्य नारायण (विष्णू) याची स्थापना करून पूजन करावें. व सपाद पदार्थांचा प्रसाद करावा. नृत्यकथा, गीत, आचरावें; वगैरें ( विशेषविस्तार मूळांत पहा) ७ अंध.

लोभ्या धन, वाक् मूका परि नामिळे; राखिला जरी नय न२६
[1]कीर्ति वर्णू तन्महिमा, अनपत्यां संतती स्वयें दे हा ॥
आधि[2]व्याधी निरसुनि, अनुपम सुख सत्य देव करि देहा२७

**श्लोक मालिनी.**

परिसुनि फलवृत्ता सौख्य झालें मनाला ॥
त्वरित हरालि चिंता तेज ये आन[3]नाला ॥
मग वदत नृपाला आजि वाणिप्रतापें ॥
मजशि सुत नसे ह्या सोडिलें तीव्र तापें ॥ २८ ॥

**श्लोक शिखरिणी.**

अशी कर्णीं वाणी, सुफल मज कोणीं, न कथिली ॥
फिटे अंती भ्रांती, रजत[4]रूप कांती, न कथिलीं ॥
व्रतें केलीं गेलीं, फलद मज झालीं, न [5]आधिचीं ॥
व्रताधीपा वंदी, करि सुशमता दीन[6]आधिची ॥२९ ॥

**आर्या.**

इच्छापूरित धन मज, परि दुःखी मीच संतती रहित ॥
आतां सत्येशकृपें, झालें करणार हेंचि तीरें हित ॥ ३० ॥

**श्लोक पृथ्वी छंद ( केकावली )**

व्रता करिन संततीस्तव अती मती लोटवे ॥

---

१ संतान ज्यास नाहीं त्यास. २ मानसिक दुःखें. ३ मुखाला. ४ रुपें (रुपें आणि कथील यांचा वर्ण एकच दिसतो, परंतु अंती रुप्याचें तेज यांत नाहीं असें स्पष्ट कळतें. हा दृष्टांत व्रतांस उद्देशून आहे. ) ५ पूर्वीं केलेलीं. ६ मानसिक दुःखाची. ७ जा नदितटीं हा होता तें तीर.

विदु:खदाचि मन्मनो[2] नसहती सती-लोट ते ॥
ह्मणून नमनास मी करिन तो दया जाणुनी[3] ॥
व्रतेश निज मानसीं करि नतोदया[4] जाणुनी ॥३१॥

**श्लोक छंद.**

मजशि जेधवां होय संतती ॥
अनुपमेयशी काय मार्त[6] ती ॥
सत्य सांगतों व्रत करीन मी ॥
जातसे गृहीं मी करी नमी ॥३२॥

**श्लोक स्वागता.**

घ्या प्रसाद उपरांत घरा जा ॥
यापरी वदतसे मग राजा ॥
ऐकुनी नृपतिची आशी वाणी ॥
राहिला स्वसुख इच्छित वाणी ॥३३॥

**ओवी.**

समग्र पूजा आटपून ॥ विप्र आनंदविले देऊन धन ॥
प्रसादानें अवघे जन ॥ तोषितमन केलें कीं ॥३४॥
साधू प्रसाद घेऊन हस्तीं ॥ याचे प्रभावें मज संतती ॥
होईल ऐसें मानून चित्तीं ॥ अति प्रीतीनें भक्षीतसे॥३५॥
झाल्यावरी मज संतान ॥ सत्यव्रत आचरीन ॥
घडो सत्य आपलें वचन ॥ करितों वंदन सर्वत्रां ॥३६॥
तंव तथास्तु बोलती द्विज ॥ ऐसेंच बोले नृपराज ॥

---

१ विशेषें करून दुःख देणारे. २ माझ्या मनांला. ३ समजून. ४ जो नत ह्मणजे नम्र त्याचा उदय ( उर्जित काळ) तो नतोदय. ५ मुद्दाम ६ गोष्ट.

आपुल्या दासाचें काज ॥ ईश्वर सहज करितसे ॥३७॥

**आर्या.**

भूपा सभ्यां वंदुनि, आनंदानें निघे घरीं याया ॥
माहेरीं कन्या कीं, दासगृहीं श्रीहरी परी या या ॥३८॥
निजसदनीं ये साधू, कांतेसि कथी सुवृत्त[1] तो मोदें[2] ॥
व्रत संतति दायक मज, सांपडलें परिस[3] येइ रतिमोदें ३९
भूपें आचरिलें व्रत, झाली मनकामना पुरी त्याची ॥
कीं तत्प्रसादसेवनिं, पूर्ण मनोरथचि कीर्ति सत्याची[4] ४०

**दिंडी.**

प्रसादाच्या सेवनां आलि केलें ॥
घडो संतान द्विजी बोलिजेलें ॥४१॥
आचरूं हें व्रत जरी प्राप्ती झाली ॥
संततीची ही कथा मनीं आली ॥४२॥

**आर्या.**

पतिवच ऐसें परिसुनि, तद्भार्या पावलीहि मुदतिशया[5] ।
प्रेमें दे आलिंगन, कंवटाळुनि बाहुनीहि सुपतिशया[6] ।४३।

**साकी.**

सत्यदयेनें तद्भार्या मग गर्भवतीहो झाली ॥
डोहाळे साधूनें पुरवुनि अत्यानंदी केली ॥४४॥
वर्णूं काय कथा ॥ उपमा नाहीं सत्यव्रता ॥धृ०॥

---

१ चांगलें वर्तमान. २ आनंदानें. ३ श्रवण कर. ४ सत्यदेव जो त्याची. ५ हर्षातिशयाला. ६ पतीच्या हस्तांला.

आनंदामधिं निमग्न असतां दशमासावधि गेला ॥
कन्या रत्न प्रसूत झाली सुदिन दिवस तो झाला॥४५॥

**दिंडी.**

सुता रत्ना पाहून पूर्ण धाला ॥
करी उत्साहा तोषवी जनाला ॥
ह्मणे मजला सत्येश पावला हो ॥
प्रेम ठेउनि वंदितां पावलां हो ॥४६॥
साधु मोदें[१] विप्रांस द्रव्य देई ॥
करा पत्रीका वदे लवलाही ॥
जन्मकाला पाहून पत्र केलें ॥
कलावंती हें नांव ठेवियेलें ॥४७॥

**ओवी.**

जातकर्म[२] नामकरण[३] ॥ अत्योत्साहें पालकारोहण[४] ॥
यथाविधी करितां द्वादश दिन ॥ भुक्त झाले आनंदे ४८
अथानंद भर्त्याप्रती ॥ अवलोकून लीलावती ॥
व्रत सूचनार्थ पतिप्रती ॥ कौतुकें भाषण करीतसे ॥४९॥

**आर्या.**

वाङ्माधुर्यें[५] बोले, संकल्पित प्राग्व्रता[६] कराना हो ॥
कीं तत्पूजनयोगें, सुखकरशी धन्यता करांना[७] हो ॥५०॥

**दिंडी.**

प्रियावचनें ऐकून मधुर ऐशीं ॥

---

१ आनंदानें. २ जन्मतः करावयाचा संस्कार. ३ बारावे दिवशीं नांव ठेवण्याचा विधी. ४ मुलांस पाळण्यांत घालण्याचा विधी. ५ मधुरवाणीनें. ६ पूर्वींचे व्रत. ७ हस्तास.

कथी प्रेमें आचरूं पुढें[1] त्यासी ॥
विवाहाचे येतांची गूणसारे ॥
आचरूनीं सानंद होऊं सारे ॥ ५१ ॥
शुक्लपक्षीं ती चंद्रकला वाढे ॥
तेंवि कन्या लावण्यकला ओढे ॥
दिवसमासीं येतेज आननाला[1] ॥
मातृताता आनंद दे मनाला ॥ ५२ ॥

**साखी.**

क्रीडा कौतुक पाहुनि नयनीं, मधुर सुतेची वाणी ॥
ऐकुनि मानी अन्य न यासम, सुख ऐसें तो वाणी ॥ ५३ ॥

**श्लोक शिखरिणी.**

असें होतां होता, बहुत दिन आप्तांसह सुखी ॥
परी कन्या अन्याजवळुनि असा न्याय सुमुखी[2] ॥
असे मानादाना, वधुसम निदाना परिसुनी ॥
वदे प्रीतीनें ती, पतिस सति लीलावति गुणी ॥ ५४ ॥

**श्लोक भुजंग प्रयात.**

तनूजे[3] पहाया वराला[4] तराला[5] ॥
असा योग्य जो कीं स्मराला[6] हराला[7] ॥

---

१ तोंडास २ हें कन्येचें विशेषण. ३ मुलीस. ४ वरावयाला. ५ वराप्रत ( नवरे मुलाला). ६ मदनास योग्य (येणें करून रूपवान असावा). वा स्मराला हराला योग्य (शरीर सुदृढत्व अ०) ७ हराला ह्मणजे शंकराला स्मराला योग्य (भक्तिमान) अशा प्रकारें पद चालनेनें वर कसा असावा या विषयीं दोन तीन आणखी श्लेषार्थ निघतात.

कांय २००

असे फार माझा मना कामना ती ॥
असें त्या कथीं यामि²नी कामि²नीती ॥ ९५ ॥

**आर्या.**

स्त्रीवच या परि परिसुनि, सांगे दूतांस कामना वरती ॥
मत्कन्येसि पहा जा, योग्य वरायास काम नांव रती ॥९६॥

**साखी.**

कां³चन नगरीं दूत येति ते, घेउनियां आज्ञेला ॥
पाहति सुंदर वर सुगुणीही, योग्य असा कन्येला॥९७॥

**आर्या.**

कुलशीलरूपसंप--युक्त गुणी पाहिला सुवर त्यांनीं ॥
कीं तो विलोकितां वर, स्वमनिं झुरावेंचि इतर वर त्यां⁴नीं ॥९८॥

**साखी.**

सन्मानुनियां कथुनि मनोदय, याती सह त्या नेला ॥
विधी विधानें मग साधूनें अर्पियलें कन्येला ॥ ९९ ॥

**श्लोक शार्दूल विक्रीडित.**

पाचारूनि समस्त आप्तजन ते, लग्नास जे आणिले ॥
त्यातें देउनि पुष्पहार गजरे, तांबूल तोषीवले ॥
वाद्यें चित्र विचित्र वाजति तयीं, वारां⁵गना नाचती ॥
आनंदस्थिति पूर्णता मज गमे, जी वर्णवेनाच ती॥६०॥

**श्लोक इंद्रवज्रा.**

आनंद साधूस बहूत झाला ॥

---

१ रात्रीं. २ स्त्री. ३ नामक नगर. ४ वरणाऱ्यांनीं (वधूनीं). ५ नृत्यकरणाऱ्या स्त्रिया वेश्यादि.

पाचारिलें त्या स्थलिं हो द्विजांला ॥
मांगल्य वाद्यें विविध[1] प्रकारी ॥
आणीलिं तीं गर्जति सौख्यकारी ॥ ६१ ॥

**श्लोक भुजंग प्रयात.**

बहू इष्ट मित्रादिकां भोजनाला ॥
बलाऊनि तो सौख्य देई जनाला ॥
करी पंच पक्वान्न नाना पदार्थ ॥
सुन्हृन्मित्रे[2] संतुष्ट व्हावें यदर्थ ॥ ६२ ॥

**श्लोक अनुष्टुप्.**

दीधलें भोजनाद्रव्या ॥ प्रार्थिलें बहुतां परी ॥
त्याकालीं अति सर्वत्रां, जाहलें सुख अंतरीं ॥ ६३ ॥

**आर्या.**

या परि उत्साह करूनि, तोषविले विप्र[3] देउनी दानें ॥
दिधला आनंद असा, नसताचि वदे मला न पुत्रानें ॥६४॥
सर्वां आनंदवि परि, झाली कन्या तयासि जा नवसें ॥
तें व्रत समयिं करावें, या स्मृतिचा लेशही मनीं न वसे॥६५॥
आनंद मग्न होउनि, न स्मरुनी सद्व्रतासि अंतरलें ॥
दुःखित होतिल तेणें, परि अंतीं ह्या व्रतेंचि ते तरलें॥६६॥
भाग्यवशाद्व्रतविस्मृति, होतां प्रभुमानसांत ये ऐसें ॥
दावावें दुःख यया, जेणें सेवन घडेल मम तैसें ॥ ६७ ॥

**साखी.**

पुढतीं एक दिवशीं चित्तीं, साधुस ऐसें भावे ॥

---

१ अनेक तऱ्हेचीं. २ आप्तमित्र. ३ ब्राह्मण. ॥ ४ वाटे.

व्यापारास्तव अन्य ठिकाणीं, द्रव्य घेउनी जावें ॥६८॥

**आर्या.**

जामातृसहित मग तो, वाणिज्यार्था धरून चित्तांत ॥
जातां विचित्र गति जी, घडली परिसा[1] पुढील वृत्तांत ॥६९॥

**ओंवी.**

जामाता घेऊनि बरोबरी ॥ पातले ते रत्नसार पुरीं ॥
तेथें व्यापार करूनि उपरि ॥ पुढें सत्वरें चाललें ॥ ७० ॥

**दिंडी.**

अहो ऐसे चालिले वणिज दोघे॥पुढें व्यापारा करित येत ओघें॥
चंद्रकेतूचें नगर देखियेलें॥विक्रयार्था वास्तव्य तयीं केलें॥७१॥

**श्लोक छंद.**

विसरला व्रता होंचि पाहुनी ॥
दुःख दाखवी देव त्याहुनी ॥
शाप देतसे तो अशा परी ॥
कठिण दुःख हो न तु अशापरी ॥ ७२ ॥

**अभंग चारचरणी.**

तया दिनीं ऐसा, चमत्कार झाला ॥
राजाचा गृहाला, चोर आले ॥ ७३ ॥
चोरूनियां धन, चालिले माघारे ॥
रक्षकानें सारें, देखियेलें ॥ ७४ ॥

**पद ( पोवाडा. )**

( जिकडे तिकडे कली मातला कठिण काळ हा आला पुढें, या चालीवर )

---

१ श्रवणकरा.

जिकडे तिकडे दूत धांवती, अवलोकाया चोराला ॥
धरणें आलें पाहुन तस्कर, पावति ते बहु भीतीला ॥
निद्रित होते वाणी जेथें, टाकुनि तेथें द्रव्याला ॥
चुकवुनि नजरा जरों भीतभित पळून गेले समयाला ॥
दूत येउनी द्रव्य पाहती, बांधिति निद्रत वणिजाला ॥
विचार शून्यचि दूत भासती, तिळभर नाहिंदया जाला ॥
बध्द करूनि आनंदानें, आणुनि दाविति त्या राजा ॥
"बडे हरामी काफर" ह्मणती, यांनीं केली असी मजा७५

आर्या

मार्गीं येतां दूतां, दीनापरि विनविती अनेक रिती ॥
तद्बंधमुक्तिसाठीं, दुःखित होऊन शोक ते करिती॥७६॥
परि दोघातें राया–संनिध आणून करिती लटपट ते ॥
वदती मनमाने तें, गतभाग्यें सत्यही उलट पटतें ॥७७॥
हर्षें रक्षक सांगति, ऐसे तस्कर न देखिले नयनीं ॥
पाहुनियां आह्मातें, नृपधन संनिध असून हे शयनीं ॥७८॥
पुसतां असत्य वदती, ह्मणती धन पाहिलें न नयनांहीं ॥
या परि आजन्मींही, घडला हातून या अनर्थ नाहीं॥७९॥
नृपधन हें सांपडलें, यास्तव धरिले खरेंची ठक वाटे ॥
यांतें दटाविलें बहु, होईना कबुल हे निमकं वाटे ॥८०॥

---

१ चोर. २ थोडक्याशा (नजरांचे विशेषण) पूर्वीं दुःखी होते त्याहून. ३ दैवहीनत्वानें. ४ हतभाग्य झाल्यावर त्याचें सत्य भाषण ही खोटेंच भासतें, मग प्रत्यक्ष राजदूत साधू विरुद्ध सांगत असतां कां खरें वाटणार नाहीं ? ५ चोर. ६ अन्याय. ७ हराम निमक. ८ मार्गे.

### ओवी.

ऐशा दूतमुखींचा वृत्ता, ऐकून आनंद मानिला चित्ता ॥
भूप बोले आज्ञा तत्वतां, करितों आतां परिसावी ॥८१॥

### आर्या.

आज्ञा भूप करी तो, कारागारीं ययांस घालाहो ॥
धन हरण करायांचे, समजा मनिं बहुतसाची हा लाहो ॥८२॥
ऐकुनि राजाज्ञा ती, वदती वाणी आह्मी न तस्कर हो ॥
न्यायें मुक्ति दिल्याचें, जगतीं त्वद्वृत्त गा यशस्कर हो॥८३॥
अपराध ना पि घडला, परिसा मद्वच करीत नमनातें ॥
मुक्त्यर्थ वदे वाणी, दीनापरि ती रुचेच न मनातें॥८४॥
सत्येशरोषयोगें, त्याचा भूपास तो विनय न जरा ॥
पटुनि करी पूर्वाज्ञा, होउनिया वंद सर्व नयनंजरा ॥८५॥

### मादिरा ( सवाई.)

रक्षक जे अति लक्ष विलक्षण लाउनि त्यास्थलिं बैसुनि होते ॥
निक्षुनि तत्क्षणिं नेति तया तयें, भासति राक्षस रूप अहो ते॥
दक्षपणें वर रक्षुनि वर्तन, पक्षधरू कुणि साक्ष मिळेना ॥
चक्षु तुला कमलाक्षपते मज,रक्षिल याक्षणिं कोण कळेना॥८६॥

### आर्या.

भोगावि कारागारीं, दुःख बहू करिति व्रत न या करितां ॥
त्या भगवंत दयेविण, न त्रिजगीं तत्रं जतन या करिता॥८७॥

---

१ लाभ. २ चोर. ३ तुझें वर्तमान. ४ माझें वच न
५ सुटावयास्तव. ६ रुचून. ७ न्यायदृष्टि. ७ तेथें.

### श्लोक भुजंग प्रयात.

असें त्या द्वया दुःख झालें विशेषीं ॥
तयाचा गृहीं जाहली स्थीति कैसी ॥
बहू चोर आले धनातें हराया ॥
महद्दुःख झालें नये सांवराया ॥ ८८ ॥

### आर्या.

पूर्वींच पतिवियोगें, गाईपरि दीन जाहल्या होत्या ॥
तस्कररूपीं व्याघ्रा, पाहुनि शव[1]तुल्य जाहल्या होत्या ॥८९॥
त्या दुष्ट तस्करीं मग, न दुजें कोणी गृहांत पाहूनी ॥
ताम्रमयहि भाजनें[2] सह, नेलें धन तें समस्त वाहूनी ॥९०॥
झाल्या सुदीन अबला, पतिविरहाग्नींत नित्य हुरपळती ॥
निर्धन जाणुनि दोघी, आप्त सखे सर्व दूरदुर पळती॥९१॥

### श्लोक शिखरिणी.

मनीं भीती मोठी, स्वजन धरिती हीच इतुकी ॥
समाचार जातां, धन वसन[3] ह्या मागतिल कीं ॥
सखे मामा बंधू, सधन समयीं येति हरिखें[4] ॥
अपत्कालीं होती, स्वजन परक्यांहून परके ॥ ९२ ॥

### श्लोक मालिनी.

कठिण समय येतां रावही रंक होतो ॥
परि सुजन पणानें काळ न्यावा अहो तो ॥
त्यजुन कुपंथ[5] राहे देव तत्साह्यकारी ॥

---

१ प्रेतवत्. २ भांड्यासुध्धां. ३ वस्त्र. ४ आनंदानें (हर्षानें. ५ दुर्मार्ग.

[library stamp]

निरसन करि विघ्नें तोंचि नाना प्रकारीं ॥ ९३ ॥

**श्लोक भुजंग प्रयात.**

जयाचा सुखा वर्णिती लोक सारे ॥
अहा त्या गृहीं काळ आला कसा रे ॥
उरे अन्न वा वस्त्र कांहीं न रामा ॥
स्वयें यांचिती होउनी दीन रामा[1] ॥ ९४ ॥

**आर्या.**

आधि[2] व्याधीयुतशा, होउनि चिंता करीति अन्नाची ॥
फिरती गृहोगृहीं परि, स्मृति नाहीं त्या व्रतेशपुजनाची[3] ९५
एके दिवशीं शिणली, नमिळे परि अन्न त्या कलावतिला ॥
तरि त्या ग्रामीं कोणी, प्रेमें न वदेच जा बलाव तिला ९६

**श्लोक मालिनी.**

मग पुनरपि सायंकालिं अन्नार्थ जाई ॥
फिरत फिरत एका, विप्रसद्मासि[4] येई ॥
सदनिं करित होता, विप्र सत्यव्रतातें ॥
मनसुख पुरवाया, आंगिं जा तीव्रता तें ॥ ९७ ॥

**दिंडी.**

तया ठायां ती जाउनियां कन्या ॥
पाहि आचरितां व्रता द्विजा अन्या ॥
करूनि नमना प्रार्थना फार केली ॥
सुखें येवो पतिपिता बोलिजली ॥ ९८ ॥

---

१ स्त्रिया. २ मानसिक दुखें. ३ व्रत-ईश (सत्यनारायण.
४ ब्राह्मणाचे घरीं.

### ओवी.

सत्यपूजन कथाश्रवण ॥ व्हावया झाली रात्र जाण॥
तदनंतर प्रसाद सेऊन ॥ निघे परतून यावया ॥ ९९ ॥

### अंजनीगीत.

झाला तनुजेला[१] कां उशिर ॥
रात्री झाली दीड प्रहर ॥
माता मानसीं करी विचार ॥
तों कन्या आली ॥ १०० ॥
पाहुनि तिजला बोले माता ॥
त्वद्गमनें मज झाली चिंता ॥
तुजला शोधायाला आतां ॥
येताचि मी होतें ॥ १०१ ॥
रजनी[२] ऐशी होतां जाण ॥
दोषच देतिल बहूत जन ॥
आहों आपण सुकूल वान ॥
कलंक लागल कीं ॥ १०२ ॥

### आर्या.

कथितें सन्मार्ग तुला, हितकर सत्शास्त्र मी न नव दावी ॥
वागावें त्याचि पथें, सूज्ञांहीं जा दुरुक्ति[३] न वदावी[४] ॥ १०३ ॥

### श्लोक पृथ्वीछंद ( केकावली)

निशीस न कधीं सुते, गमन सुस्त्रियांनीं करूं ॥
परस्थलि तशांत तूं, तरुण नेटकी सुंदरू[५] ॥

---

१ मुलीस. २रात्रीं. ३वाईट भाषण. ४ बोलावी. ५ मनोहर.

भ्रतारचरणांकडे, धरुनि दृष्टि ही नश्वर[1] ॥
अहर्निशीं[2] मनास ह्या जितुन आठवी ईश्वर॥१०४॥
सदां सुख नसे प्रभूप्रतिहि दुःख ये भोगणें ॥
अशास्तवाचि निग्रहें जगिं सुनीतिनें वागणें ॥
असून हतभाग्य गे नितिस रक्षिल्या उत्तमा[3] ॥
तरीहि नुपजे दया कधिं न काय सर्वोत्तमा[4] ॥१०५॥

आर्या.

शिष्यां गुरु, भक्तां सुर[5], अमरां[6] श्रीविष्णु, हा जसा मान्य ॥
तेंवि सेवेसि पति, सुस्त्रीला योग्य तो न सामान्य ॥१०६॥
पातिव्रत्यावांचुनि, जी स्त्री कंठील काळ वांचून ॥
धिग्धिग् जिणें तियेचें, देतें यच्चरित दुःख वाचून[7]॥१०७॥
ती द्रौपदी अहिल्या, तारा, मंदोदरी, सिता, जगतीं ॥
पातिव्रत्यगुणानें, वंद्य जहाल्याचि हस्तिराजगति ॥ १०८ ॥

दिंडी.

स्त्रियालागीं हा मुख्य असे धर्म ॥
त्यजुनि धर्मा या करिल अन्य कर्म ॥
तरी बध्धक होईल हेंचि वर्म ॥
तुला कथिलें मी सुते धर्ममर्म ॥ १०९ ॥

श्लोक पृथ्वीछंद ( केकावली )

सुते सुपथ हा बरा तुज न इष्ट चित्तास ये ॥

---

१ स्थीर. (चलनव्हे) २ रात्रंदिवस. ३ हें नीतीचें विशेषण. ४ परमेश्वराला. ५ देव. ६ देवांना. ७ वाचणें ह्या पासून झालेलें भू० का० धातु साधित अ०

तरी मजशिं दुःख दे बहुत दुष्ट चिंता सये ॥
यमापरिस तें मला बहुत जाचतें दूषण ॥
जगीं वदाति जें बरें मजशिं तें गमे भूषण ॥११०॥

**श्लोक भुजंग प्रयात.**

जरी जाहली रात्र तूंतें अशी गे ॥
तरी दोष देतील हे लोक रंगें ॥
जगीं बोलताती दरिद्रीपणाच्या ॥
मुळें त्यागिती रीति सुस्त्रीपणाच्या ॥१११॥

**अंजनी गीत.**

अन्नासाठीं झालों दीन ॥
तरी भिक्षेला अवघा दीनं[1]॥
आहे त्यांतचि मिळेल अन्न॥
तें भक्षुनि राहूं ॥ ११२ ॥
कठिण बहुतसा काळहि गेला ॥
परि तूं कधिं हि न विलंब[2] केला ॥
आजचि कां गे उशीर झाला ॥
कथन करी मातें ॥ ११३ ॥

**लावणी.**

( असतां मी निशिदिनीं तुमच्या सेवेसी तत्पर ॥ ह्या चालीवर)
ह्मणे कलावति ऐके कारण गे सत्वर मातें ॥
विप्रगृहीं सुव्रतासि पाहुनि आल्यें धामातें[3] ॥
सत्येशाचा प्रसाद सेउनि ठेउनि प्रेमातें ॥

---

१ दिवस २ उशीर. ३ घरास.

केलि विनंती पूर्ण करीं मच्चिंतित[1] कामातें[2] ॥
कथा ऐकिली भासे तेणें होइल फल मातें॥
व्रत करितां हें फिरविल वाटे विधिच्या कलमातें ॥
॥ चाल ॥ ऐकुनी सुतेतें काय वदत माता ॥
ही खूणच पटली ऐक कथन आतां ॥
संततीस्तव द्रूय करित होतों चिंता ॥
ह्याचि व्रतें मज संतति झाली तूं जन्मा आली॥
जननकालीं हें व्रत करणें परि ती संधी गेली॥ धृ० १
तनुजे[3] तुझिया विवाहसमयीं सद्व्रत आचरणा ॥
करणें परि दैवच हें खोटें विसरलों चरणा[4] ॥
फलश्रुती ऐकवून मजला केलें तूं स्मरणा ॥
प्रस्तुत वाटे तेंचि करावें या अंतःकरणा ॥
मातेच्या संमतासि पाहुनि संचरिलें स्फुरणा ॥
पूजेचें साहित्य सुतेनें मेळाविलें सदना ॥
॥ चाल ॥ मग इष्ट जनातें सादर[5] बोलविलें ॥
तिहीं प्रेम पुरस्कर सद्व्रत आचरिलें ॥
सेउनी प्रसादा वदती अंतर्[6]लें ॥
सुखें स्वसदनीं पति यावे ही विनंती केली ॥
जनन कालिं हें व्रत० ॥ धृ० ॥ २ ॥ ११४ ॥

**श्लोक भुजंग प्रयात.**

स्त्रियांनीं गृहीं ईश-पूजेसी केलें ॥
तयीं सत्यनारायण स्वाप्निं गेले ॥

---

१ माझें चिंतिलेलें. २ मनोरथाला. ३ मुली. ४ प्रभूचे पायांला ५ आदरपूर्वक. ६ याचा क० पति.

स्वयें चंद्रकेतूस बोधा करीती ॥
कशा दाविल्या साधुतें धाक—रीती ॥ ११५ ॥
विना आपराधें सजामात साधू ॥
कसा बंदिं तूं घातला काय बोधूं ॥
त्वरें मुक्त यातें करीरे नृपाळा ॥
असें बोलुनी देव तो गुप्त झाला ॥ ११६ ॥

**ओंवी.**

दैदीप्यमान भगवंतमूर्ती॥ पाहतांचि उपजली बहुत भीती ॥
वचन ऐकतां तयाचे चित्तीं ॥ साधुप्रीती उद्भवली ॥११७॥
राजा आति विस्मित अंतरीं ॥ होऊनि ह्मणे मी कारागारीं[1] ॥
न्याय न करितां घातले परी ॥ मज ईश्वरीं राखिलें ॥११८॥

**अंजनी गीत.**

प्रात:काल होतां जाण ॥ सभे भूप तो करि आगमन ॥
ह्मणतो ऐका हो सभाजन ॥ कुतुहलें[2] हें मोठें ॥ ११९ ॥
ऐसें बोलुनि सांगे मात ॥ स्वप्नीं झाला मज दृष्टांत ॥
सोडावा साधु सजामात ॥ हो लौकर आतां ॥ १२० ॥
दूतांलागीं आज्ञापून ॥ आणिले ते महाजन ॥
बोले सुप्रसन्न भगवान ॥ भक्तिबळें तुह्मां ॥१२१॥
स्वप्नीं येउन परमेश्वर ॥ अद्भुत दावी चमत्कार ॥
बिन अपराधी अहांत थोर ॥ परिसा[3] मद्विनती ॥ १२२ ॥

**आर्या.**

केलें मुक्त तुह्मा जा, द्विगुणित धन घ्या सजा[4] सुखें बागा ॥

---

१ तुरूंगांत. २ कौतुक. ३ श्रवणकरा. ४ बंदिवानाचा पोषाक टाकून चांगला घ्या.

दैवें दुर्गति झाली, परि श्री हरिला पुजा मुखें वा गा॥१२३॥

**श्लोक पृथ्वी छंद ( केकावली )**

अशीं मधुर भाषणें परिसुनी वदे भूपती[1] ॥
सुदैव फिरतां अहो महेद[2] काल ही कांपती ॥
तिथें मज कसा निघ दम नसे जना धीर तो॥
परी मजशि मुक्त जो करि तयीं मना धी[3]रतो॥१२४॥

**कटिबंध.**

हर्ष झाला तयास फार, करुनी भूपां नमस्कार, मार्ग क्रमि-ती ते सत्वर, तों भगवान सर्वेश्वर, रूप धरुनि स्वामीवर, होते जामात श्वशूर, समुद्रांत जा नौकेवर, तेथें येउन पुंसे तयाला काय असे नौकेंत मला तें, सांगावें पुसतसे तुह्मांला ऐकण्याची इच्छा माझी, होउनि राजी सांगा गाजी, जामात वदे नौके माजी, लतातन्न परि पूरित भाजी, कांहो पुसतां? कोठें वसतां, कोठिलरे तूं कोण गुमास्ता, बोलुनि आधीं तुह्मीच फसतां, पकडी आतां आपुला रस्ता, इथें कशाला आलासि मस्ता, कोण आह्मी तें नाहीं जाणिलें, असशिल इतरांतेंचि फसविलें परी ठका तुज आह्मी वळखिलें, सत्व पहाया ईश्वर आले, हें न जाणुनी उद्धट बोले, द्रव्य मदानें बहूत डोले, जाइं परत जिवदान दिलें तुज, ऐशा नाना परी वदला गोष्टी ॥१॥ संपती मोठी खोटी, सत्वाला पडते गांठी ॥धृ॥ ऐसें ऐकुनि श्रीरंगानें ऐशी स्थिति ही

१ हे राजा. २ आनंद देणारे. ३ सती. ४ परमेश्वर मुद्दाम वेष पालटून परिक्षार्थ विचारी. ( अभिमानाच्या. ) ६ रूपधारी परमात्मा.

धनसंगानें, जाणुनि बोले तो रंगानें असेंच होइल या भंगानें, अंगानें जरि धट्ट अहांपरि, लतापत्रपरिपूरित नौका होइल ऐसा शापचि ऐका, असें बोलुनि एकिकडे तो, झाला मग अवलोकी तिकडे. बाढ्वित होती नौका जिकडे, तींत लतेचें पत्र तुकडे, गुप्त जहालें द्रव्य रोकडें, या परि मग पाहून रडे, धडपडे मनांतरिं, पडे मूर्छित होउनि धाडकन् श्वशूर तेथें येउनि झटकन, काय ह्मणे, हें झालें पटकन्, नेत्राश्रूनें डोळे भरले; शोकस्वरानें कंठ नूरले, ह्मणे व्रतेशा आनादरिलें त्याच्या वचनाला अंतरिलें, तच्छापानें झालों कष्टी ॥२॥ संपत्ती० ॥धृ॥ जगदीशाची अगम्य करणी, मानुनि ऐसें अंतःकरणीं, यद्वचनेंही हलकी तरणी[1] झालि तयाची करूं मनधरणी, चल साधोरे लागूं चरणीं, श्रद्धाचरणीं, नामस्मरणीं, प्रेम ठेउनी, तद्यश[2] वर्णीं स्पष्ट सुवर्णीं धरणीं चरणीं लोळण घेउनि, श्रेष्टेशातें तुष्ट करिशि जरि कष्ट नष्ट हे होउनि अवघे स्पष्ट सांगतों श्रेष्ठत्वातें पावशि निश्चित दुष्ट मानसीं होत्साता मग इष्टसुखातें वरशिल सत्वर शोक पुरे कर उपाय सुखकर सुचला जो तो करूंगा लौकर कर जोडुनियां विनंति करितां भगवान तो देईल तुष्टी ॥३॥ संपत्ती मोठी खोटी ॥ सत्वासी पडते गांठी ॥ धृ ॥ १२५ ॥

## लावणी[3].

( आसतां मी निशिदिनीं तुमच्या सेवेला तत्पर ह्या चा० )

यापरि युक्ती सुचतां ते हो बहुताचि आनंदले ॥ तापस शोधित

---

१ नौका. २ त्याचें यश. ३ ह्या चालीची लावणी २९ पानावर आहे.

[library stamp]

होता तेथें अभ्यर्थी गेले ॥ वंदन करून बोलति तुझिया वचना अंतरलें ॥ दीन आम्ही बहु अज्ञानानें अपराधा केलें ॥ अद्भुत माया ईशा तुझि ही आतां मला कळलें ॥ मायेनें जग मोहित परि मन तव पदिं हें वळलें॥चाल॥आतां क्षमा करीं या दीन अशा बालकां ॥ होउ जसें तसें धन विश्वाच्या पालका॥ आलों शरण तुला मग भोगविशी हाल कां ? काय करूं तव ध्यान कळेना सोडविलें बंदीं ॥ वाणुं किती मी शेषहि थकले गति किति मति–मंदीं ॥ गर्वा त्यागुनि जे नर लागति ईशचरणछंदीं ॥ भक्तांचें त्या देव करीहो बहुमन आनंदी ॥ धृ०॥ १ ॥ पाहुनि भक्ती ऐकुनि स्तुति ही बोले वचनाला ॥ केला कसा अन्याय असा तूं मजला वीसरला ॥ संकल्पित मम व्रतास त्यागुनि कर्मा अनुसरला ॥ दुर्मार्गानें आचरलासी टाकुनि त्या सरलां[1] ॥ ह्मणुनि अशा दुःखांत येशि परि भोग तुझा सरला ॥ प्रसंन झालों भक्तिबळें तुज कोप मनीं विरला॥ ॥ चाल ॥ जाहली कृपा मग धन आलें सर्वही ॥ गेला सर्व पळोनी मनांतील गर्वही ॥ तें झालें तयां आनंदाचें पर्वही ॥ करूं तुझें व्रत असेंचि बोलुनि पदांबुजां[2] वंदी ॥ क्रमिती पथ स्वगृहिंचा सत्वर होउनि स्वच्छंदी ॥ गर्वा त्यागुनि जेनर ॥ धृ०॥ २ ॥ १२६॥

अंजनी गीत.

मार्ग क्रमितां ते अवसरीं ॥
समीप आली रत्नपुरी ॥
साधू जामाता अंतरीं ॥

---

१ हें मार्गाचें विशेषण २ पदकमलांस.

आनंदचि झाला ॥ १२७ ॥

**आर्या.**

निज–वित्तरक्षकातें, पाठविलें सांगुनी स्वसदनातें ॥
प्रेमें या दोघीला, आलों हें कळवुनीच वद नातें ॥ १२८ ॥
प्रेषितें[1] दूतें येउनि, पाहुनि भार्या कलावती कन्या ॥
ह्मणती कीं धनि गृहहें, काल गती ही अशी असे धन्या॥ १२९

**श्लोक भुजंग प्रयात.**

जयाची अशी संपती आणि सत्ता ॥
तयाच्या गृहीं पाहिली अंन–चिंता ॥
असो पातला हा सजामात भर्ता ॥
कथा यास पाचारिती ही सुवार्ता ॥ १३० ॥

**ओवी.**

लीलावती आणि तत्सुता ॥ करीत होत्या मानसीं चिंता ॥
कोण कोठील पुसावें वृत्ता ॥ ह्मणून सत्वर पातल्या ॥१३१॥

**अंजनी गीत.**

माता बोले तुह्मी कोण ॥
केलें कांहो तरि आगमन ॥
ऐकायाला माझें मन ॥
इच्छितसें भारी ॥ १३२ ॥
करून कथनासी यथार्थ ॥
मजला तुमचें अवघे वृत्त ॥
मन्मानसिचा पुरवा हेत ॥

---

१ पाठविलेले दूत.

हो लौकर आतां ॥ १३३ ॥

गीत.

( दामाजी पंताच्या चालीवर. )

वंदन करुनी मग बोलति दूत, पतिसह जामात ॥
आलों पुढतीं ते मागुनियेत, आहेत नावेंत ॥
आतां येतिल सत्वर सारीं, उत्सह होईल आपल्या घरीं १३४॥
हारी संकट भक्तांचें हारी ॥ किति वर्णूं थोरी ॥ धृ० ॥
चंद्रकेतूच्या ही नगरीं ॥ आले व्यापारी ॥
तेथें वर्तली नवलपरी ॥ भूपगृहीं चोरी ॥
तस्कर पळुनी गेले दूरी, वहीम आला यांचे वरी ॥
हारी संकट भक्ताचें हारी ॥ किति वर्णूं थोरी ॥ १३५ ॥
तेथें पडले मग हे बंदींत ॥ परि केलें मुक्त ॥
सत्येश येउनियां स्वप्नांत ॥ दावी दृष्टांत ॥
वणिजां सोडुनि दे लौकरी ॥ भूपा तरीच तव गत बरी १३६
हारी संकट० ॥ धृ० ॥
राजा मग बहु विस्मित होऊन ॥ दोघां आणून ॥
नाहींत अपराधी हें जाणून ॥ करि मुक्ति जाण ॥
द्विगुणित धन देउनि माघारीं ॥ जावयाचि आज्ञा करी १३७
हारी संकट० ॥ धृ० ॥
घेऊनि राजाज्ञा द्विगुणित धन ॥ आनंद मानून ॥
येतां मार्गीं हो नारायणा ॥ स्वरूप बदलून ॥
पुसतां असत्य वदले त्यासीं ॥ तेणें जाली गत तरि कैसी १३८
हारी संकट० ॥ धृ० ॥

---

१ हें मनुष्याचें विशेषण.

गुप्त झालें तें अवघें धन ॥ अहो दुःखितमन ॥
वंदन करितां देवाचे चरण ॥ शुद्धांतःकरणें ॥
पूर्वी होतें तैसें झालें ॥सर्वहि धन मग परतुनि आलें ॥१३९॥
हारी संकट०॥ धृ०॥
ग्रामासंनीध पति जामात ॥ आलों समस्त ॥
आह्मां पाठविलें पूढें त्वरित ॥ कळवाया मात ॥
आतां जाउनियां सामोरें ॥ घेउनि यावें तयासि घरीं॥१४०॥
हारी संकट० ॥ धृ० ॥
ऐकूनि दूताचे ऐसे बोल ॥ जेकां आमोल ॥
कन्येस वाहुनियां निश्चळ ॥ ह्मणे हाचि काळ॥
संकल्पितव्रत आतां करीं गे॥स्वजनांसह त्यांतें आदरिं गे१४१
हारी संकट० ॥ धृ० ॥
तत्काळ मिळवुनियां अवघे जन ॥ केलें शुद्ध मन ॥
स्थापूनि तेथें श्रीनारायण ॥ करिती पूजन ॥
अनन्यभावें व्रता आचरी॥मानुनि आनंद नचया सारी१४२॥
हारी संकट०॥ धृ० ॥
व्रत केलें तें अवघें पूर्ण ॥ प्रसाद वांटून ॥
कन्या भक्षण नाकरि आपण ॥ विसरली जाण ॥
लगबग पतिमुख पहाण्या भारी ॥
ह्मणुनि विसरली निजकैवारी ॥ १४३ ॥
हारी संकट० ॥ धृ० ॥

ओवी.

लीलावती आणि कलावती ॥ अवलोकाया पतीप्रती ॥
अत्योत्साहें सत्वर गती ॥ जाती दूतां समवेत ॥ १४४ ॥

आर्या.

गेली प्रसाद त्यागुनि, पत्यर्थ सुता ह्मणून तो रागें ॥

भरला सत्यश्रीहरि, पुढती चालेल काय तोरा गे ॥ १४५ ॥

ओवी.

तंव वर्तला चमत्कार ॥ एकाकीं उचंबळोनि समुद्र ॥
जामातासह तरंगी[1] सत्वर ॥ तेथें अदृश्य जाहली ॥ १४६ ॥
नाविक करिती मनीं विचार ॥ काय अघटित घडला प्रकार ॥
उदक वादळ नसोनि फार ॥ नौका कैसी बुडाली ॥ १४७ ॥
ठाव पाहून शोध करित ॥ परि तो कोठेंही न दिसत ॥
मानसीं जाहले चिंताक्रांत ॥ तों आक्रांत जाहला ॥ १४८ ॥
साधू पाहूनि हें समग्र ॥ आक्रोशें शोक करी फार ॥
सर्वही करिती हाहाःकार ॥ ह्मणती ईश्वर कोपला ॥ १४९ ॥

पद.

( गड्यानों कृष्णगडी आपुला ॥ या चालीवर. )

अदृश्य पाहुनि जामाता ॥ साधू करि बहु आकांता ॥
काय करिल याची कांता[2] ॥ दाऊं वदनें[3] कसें आतां ॥
दुःख बहु झालें हें मजला ॥ नयनाश्रूंला पूर आला ॥
यापरि करि बहु शोकाला ॥ नय० ॥ धृ० ॥
कारागारीं[4] बंधन तें ॥ गेलें सागरिं मध्घन तें ॥
तेंही दुःख कमी झालें ॥ लक्ष गुणित हें ओढवलें ॥
त्यागुन जातिल असु[5] मजला ॥ असा हा शोकद[6] तरु[7] रुजला ॥
यापरि करि बहु शोकाला ॥ नयना० ॥ २ ॥
ह्रदयीं चेतुनि सांबारी[8] ॥ होइल दुःख तिला भारी ॥
नाहीं सुख या संसारीं ॥ दुःखें भरलीं हीं सारीं ॥

---

१ नौका. २ स्त्री. ३ मुख. ४ तुरुंगांत. ५ प्राण. ६ शोक देणारा. ७ वृक्ष. ८ मदन ( सांबाचा अरि )

दर्शविण्या कन्या मजला ॥ देवा जन्म दिला तिजला ॥
यापरि करि बहु शोकाला ॥ नयना० ॥ ३ ॥ १५० ॥

**ओवी.**

शोक पाहुनी अद्भुत रिती ॥
लोक समस्त दुःखित होती ॥
तों लीलावती आणि कलावती ॥
दूतां समवेत पातल्या ॥ १५१ ॥
पाहून मानसीं अति विस्मित ॥
ह्मणती जन कांहो दुःखित ॥
लक्ष लाऊनि जों पहात ॥
तों चकित मनिं झाल्या ॥ १५२ ॥

**आर्या.**

बहु घाबरून बोले, ती कन्या वचन जें तयीं लोकां ॥
त्या दुःखद प्रसंगा, चित्तीं आणून धैर्य अवलोकां[1] १५३ ॥
अत्यानंदा त्यागुन, आक्रोशें मातपिताचि आरडतो ॥
भयविव्हल होत्साती, त्यांसि पुसे आप्तसंघ कां रडतो॥१५४॥
तों तद्विलाप शब्दीं, मृतपतिनामासि ऐकिलें काय ॥
वर्णूं तत्समयीं तो, वातें कदलीव[2] पडतसे काय[3] ॥१५५॥

**श्लोक भुजंगप्रयात.**

पडे मूर्छना येउनी देह तीचा ॥
तयीं दाटला कंठ लीलावतीचा ॥
गतप्राण झाली असा भास तीतें ॥

---

१ पहा. २ वाऱ्यानें केळ पडते तद्वत् ३ देह.

सुते पाहतां जाहला त्या सतीतें ॥ १५६ ॥

**दिंडी.**

वदे शोकें वहु दुःखि होउनी ती ॥
सुता एकुलती ममप्राण होती ॥
बाळपणचे मी गूण सांगु काई ॥
देइ आनंदा मंजु भाषणें ही ॥ १५७ ॥
पतीविरहें मानें दुःखि कीं असोनी ॥
मला दाखवि आनंद ती हसोनी ॥
सौख्य व्हावें मज ह्मणुनि विवेकाच्या ॥
गोष्टि सांगे सप्रेम सुलोकांच्या ॥ १५८ ॥
सांग[1] मदनापरि रम्य तिचा कांत ॥
त्याशिं कध्धीं जाहला न एकांत ॥
नाहिं अनुभवलें सौख्यसोहळ्यातें ॥
त्यजी तंतू[2] मांगल्यसा गळ्यातें ॥ १५९ ॥
अल्पवय तें परि गूण फार तीचे ॥
रूपलावण्यें साम्य करि रतीचें ॥
झोंक गमनाचा शुध्द गजगतीचा ॥
मला देवा घडविशी वियोग तीचा ॥१६०॥
धरूनि हृदयीं आपुल्या सुते बोले ॥
बोल मजशीं उघडुनी स्वल्प डोळे ॥
तुझा वचना मम कर्ण हे भुकेले ॥
असुनि दैवें काय हें असें केलें ॥ १६१ ॥

---

१ मदन, अनंग हे तद्रूपाचे ठायीं गौणत्व होय परंतु कांत हा सांग मदनापरि. २ मंगलसूत्र.

तरी बोलेना सुता स्वमातेशीं ॥
अहो पाहीना स्वदृष्टिनें ऐसी ॥
निचेष्टित कीं ती तनू पडालि तैसी ॥
शुद्ध प्रेताची गती होय जैसी ॥ १६२ ॥

आर्या.

घाबरली जननी अति, मूर्छित पाहून आपुली तनुजा[1] ॥
नयनातें जल लावी, मायेनें ग्रासिलें असें मनुजा ॥ १६३॥

श्लोक मालिनी.

उदक नयनिं तीच्या लाउनी जों पहात ॥
तंव हळु तनुजेनें हालवीला स्वहात ॥
नयन उघडितांना तीस ये शोकवेग ॥
तंव पुनरपि आली मूर्छना ती सवेग ॥ १६४ ॥

श्लोक द्रुतविलंबित.

घडिघडीं तिज ये अति मूर्छना ॥
उघडि ती तयिं निश्चळ नेत्र ना ॥
तळमळे उदकाविण मीन[2] हो ॥
कठिण ही स्थिती शत्रुस ही नहो ॥१६५॥

श्लोक स्वागता.

पाहती जनहि केविलवाणीं ॥
खिन्न सर्व मनिं होउनि वाणी ॥
आननीं[3] फिरविती मग पाणी[4] ॥
लावती नयनिं सत्वर पाणी ॥ १६६ ॥

---

१ मुलगी. २ मत्स्य. ३ मुखाचे ठायीं. ४ हात.

### आर्या.

पुनरपि नीरस्पर्शे, जागृत होतांचि ओरडे मातें ॥
मत्कांत मला दावी, त्याविण हें नावरे रडें मातें ॥
होती आस मनीं मज, येतिल पती पिता सुखानें हो ॥
तों पूर्वार्जित दोषें, दैवा कथिलेंचि त्या सुखा ने हो॥१६७॥

### दिंडी.

पूर्व जन्मीं मीं काय पाप केलें ॥
अशा रूपें तें आजि फळा आलें ॥
तरुण दंपत्यीं विगति असे केली ॥
काय वत्सा पासून गाय नेली ॥१६८॥
काय केलें मीं कपट गुरुपाशीं ॥
काय विप्रांतें उठविलें उपाशीं ॥
नाहिं अनुभविलें कांतसंगमातें ॥
मना कैसें शांतवूं सांग मातें ॥ १६९ ॥

### आर्या.

पतिचा वियोग घडतां, पळही सुस्त्रीस होय युगसम तें ॥
काय कथूं मत्क्लेशा, प्राणांताचें न दुःख ये समतें ॥१७० ॥
पतिविरहाग्नि ज्वाला, अति दुर्घट सोसवे नमजला ही ॥
होते सजीव असुनी, मत्तनुची[2] गमतसेचि मजला ही॥१७१॥
हे कांत कसा दिधला, अर्धांगीला सुदुस्तर वियोग ॥
मज तो त्या कमलस्थ,- भ्रमरीतें[3] जेंवि अस्तरावियोग ॥१७२

---

१ नवरा बायकोचा जोडा. २ माझ्या देहाची. ३ सूर्या स्तानंतर भ्रमरणीस पतिविरह दुःख होतें तद्वत् मजला.

**पद.**

( शिव शिव शिव शिव कांहीं न केलें ॥ सा० ) (ह्या चालीवर)

आजि कां रे सखया टाकुनि गेला ॥
निष्ठुर होऊनि या दुबळीला ॥ धृ० ॥
पाहूनि हर्षे, श्रेष्ठ स्थळाला ॥
मम जनकें[1] मशिं, अर्पिलें तुजला ॥ १ ॥ आजि० ॥
विवाहापासुनि, वियोगचि झाला ॥
प्रेमें सुखाचा, शब्द न वदलां ॥ २ ॥ आजि० ॥
अति दुर्घट ही, तशि गति मजला ॥
मीन जळाच्या, बाहेर पडला ॥ ३ ॥ आजि० ॥
मज अबलेचें, दैवत भर्ता ॥
त्याविण दुसरा, न जगीं त्राता ॥ ४ ॥ आजि० ॥
हे मम कांता, चित्तहरा या ॥
अन्य न कोणी, देव स्मरा[2]या ॥५॥ आजि०॥१७३॥

**आर्या.**

या भूलोकीं न दुजा, भर्तृवियोगाग्नि दुःखशमनातें ॥
यास्तव उपाय करणें, भासतसे योग्य साहस मनातें ॥१७४॥
त्वद्विरहित पलही मज, युगसम भासे ह्मणून तव लोकीं ॥
घेऊनि पादुकातें, येतें मी त्यजुनि देह अवलोकीं[3] ॥ १७५ ॥

**दिंडी.**

पाहुनीयां अति शोक वदे माता ॥
अगे तनुजे तूं पुरे करीं आतां ॥

---

१ पित्यानें. २ हा शब्द श्लिष्ट आहे इकडे लक्ष द्यावें. ३ पहा.

आह्मां होतें बहु दुःख सुते पाहीं ॥
गोष्ट घडली परतून येत नाहीं ॥ १७६ ॥
तुझ्या साठीं बहु यत्न सुखें केले ॥
तयीं मजला हे आजि दीन आले ॥
अशा मातें तूं कींवि दुःख देशी ॥
सती जाऊनि करिशि कीं विदेशी ॥ १७७ ॥

### आर्या.

माता स्वांकीं घेउनि, युक्त्या[1] करि हृद्य शांतवन कांहीं ॥
कन्या तदा वदे मज, दावा पति सद्यशास्तव नका ही १७८
जाची मत्कायेतें, दुःखद अत्यंत वीरहानल[2] गे ॥
तेणें मज हेंचि गमें, पतिविण जो व्यर्थ देह हा नलगे॥ १७९॥
माता वदे पुरा करिं, दुःखद हा त्वद्विलाप मत्तनुजे[3] ॥
शोकें करूं नको कृश झाली चिताग्निदग्ध[4] त्वत्तनु जे ॥१८०॥
निकरें वदे सुता मज, देह नको तूंचि सागरीं लोट ॥
ऐकुनि हें जननीच्या, आले दुःखाश्रुसागरीं[5] लोट ॥१८१॥
शोकीं निमग्न होउन, करिती अत्यंत मग विलापरवा ॥
परवा न धरून वदे, बुडतें दुःखार्णवीं मला तरवा ॥१८२॥

### श्लोक मालिनी.

मग वदत सुता ती काय सप्रेम मातें ॥
त्यज लवकरि शोका जाहलें सौख्य मातें ॥

---

१ युक्तीनें. २ विरह हाच अनल ह्म० अग्नि. ३ माझे मुली. ४ चिंता हाच अग्नि येणेंकरून दग्ध, हें तनूचें विशेषण. ५ दुःखसमुद्रांत.

बहुत दिवस जाचा जाहलासे वियोग ॥
मिळाति मरणकालीं पादुका केंवि योग ॥ १८३ ॥

श्लोक भुजंगप्रयात.

जगीं बोलती विप्र ती धन्य रामा[1] ॥
पतीसंगती जाइ जी देवधामा ॥
मला आजि दैवें असा योग आला ॥
कमी काय तेथें सुखा कौतुकाला ॥ १८४ ॥

श्लोक स्वागता.

मी सुखें करितसें गमनातें ॥
दुःख मानुंचि नको ग मनातें ॥
धर्म हाचि सुअहेवपणाचा ॥
हा लळा पुरवि दीनपणाचा ॥ १८५ ॥

श्लोक भुजंगप्रयात.

असें ऐकुनी जें स्वमाता सुतेतें ॥
वदे शांतवाया कथूं काय तें तें ॥
श्रमें घर्म[2] ये जो मुखांऽभोरुहातें[3] ॥
पुसी आश्रु तैसेंच सप्रेम हातें[4] ॥ १८६ ॥

दिंडी.

धन्य तनुजे गे कलावती बाई ॥
पतीसाठीं चालली स्वयें देहीं ॥
तुझी कीर्ती गाजेल जगीं पाहीं ॥
मजाशि दैवीं संतान सौख्य नाहीं ॥ १८७ ॥

---

१ स्त्री. २ घाम. ३ मुखकमलास. ४ हातानें.

**आर्या.**

संततिपासुनि ऐसें, होइल अति दुःख हें मला कळतें ॥
जरि देवा पूर्वीं तरि,नवस कराया कधीं न मन वळतें॥ १८८॥
नलगे संतति मजला, बोले लीलावती विलापरवें ॥
या संततिच्या दुःखें, वाटे बहु वांझपण मला बरवें ॥१८९॥

**दिंडी.**

अरे जामाता काय दुःख दीलें ।
लोभ लाऊनी कसें अंतरीलें ॥
तुला तरि मी हा दोष कसा देऊं ॥
दोष दैवा लाऊन काळ नेऊ ॥ १९० ॥

**आर्या.**

मजसारखी अभागी, देवा कोणी असेल कां जो[1]षा ॥
देवा मजवांचुनि तुज, जाचाया स्थान नाहिं कां जायों[2] १९१
मारुाने हांका यापरि, देवा दैवासि कंठ शोकविला ॥
शोक-विलाप अशक्याचे,कठिण समय वर्णवे न तो कविला १९२
लोकीं बहु शांतविलें, परि कोणी शांत जाहल्या न जरा ॥
आक्रोशें रुदनानें, अतिशयितचि मंद जाहल्या नजरा १९३

**साखी.**

( हिंदस्थानी भाषेत. )

तब बनिया यहि करत बिचारा, पूर चलत आखनमो ॥
भवचक्करका फेरा कैसा, आवत सब इसमनमो ॥ १९४ ॥
सुनो कहत इस नजीक आकर सोक अबी मतकरना ॥
दीननाथ प्रभु सत् नारायन, यही, नाम तुम स्मरना ॥१९५॥
तब बेटी आलिंगन देकर, रोवत[3] कहत पिताजी ॥
आया कैसो कठन बखत[4] ये, कहां गये नाथाजी ॥ १९६॥

---

१ स्त्री. २ जावयाला. ३ रडत. ४ वेळ.

**आर्या.**

ठेऊनि काळ नेला, इच्छा प्रियपतिसह त्वदागमनीं ॥
आतां कोठल कसा, करूनीं सुविचार सत्य सांग मनीं।१९७।

**श्लोक भुजंग प्रयात.**

सुतेची अशी ऐकुनीयां सुवाणी ॥
वदे प्रीतिनें तीस तो साधुवाणी ॥
अगे भाव ठेऊनियां ईश्वरातें ॥
भजावें तया राखि जो त्या क्षरातें[1] ॥१९८॥

**ओवी.**

सत्यनारायण दैवत सुंदर ॥ अघटित तयाची माया अपार॥
तयाचें स्मरण निरंतर ॥ करीत असावें निर्धारें ॥१९९॥
ऐकूनियां पित्याचें वचन ॥ प्रेमें बोले तया लागुन ॥
ऐके करितें जें मी कथन ॥ सावधानचित्तें तूं ॥२००॥

**दिंडी.**

॥ एक समयीं मी विप्रगृहीं गेलें ॥
॥ सत्यनारायण व्रता देखियेलें ॥
॥ सुखें यावें हा हेतु धरूनि केलें ॥
॥ सांग बापा तें काय फळा आलें ॥२०१॥

**ओवी.**

ऐकतां व्रताची मात[2] ॥ह्मणे येणेंचि झालों बंधमुक्त ॥
त्याच काळीं धन अत्यंत ॥ मजला प्राप्त जहालें ॥२०२॥
ह्याचि व्रतें मज संतान ॥ प्राप्त जहालें बंध-मोचन[3] ॥
जरी होईल जामातदर्शन ॥ व्रता करीन सानंदे ॥२०३॥
धांव पाव गा जगन्मोहना ॥ हें अनिवार दुःख साहेना ॥
हो प्रसन्न सत्यनारायणा ॥करुणा-घना[4] मजवरी ॥२०४॥

---

१ नाशिवंताला. २ गोष्ट. ३ बंधांतून सुटणें. ४ हे करुणेचा मेघा.

ऐकून तयाची कीर्ती ॥ सर्वत्र तद्गुण यश गाती ॥
साधूच्या मानसीं उपजोनि प्रीति॥धांवा करिती देवाचा।२०५।

॥ धांवा ॥

[विडा घ्याहो नारायणा ॥कृष्णा जगत्र जीवना॥ हीचाल]

धांवरे श्रीनारायणा ॥ आतां येऊं दे करुणा ॥
मजवरी करीं कृपा ॥ दूर करीं या संतापा ॥धृ०॥
अन्याय काय झाला ॥ जामात अदृश्य केला ॥
सुचेना मज कांहीं ॥ तुजविण कोणी नाहीं॥१।धा०।
संकटीं पावलासी ॥ भूपा दृष्टांत देसी ॥
आठवूं गुण कीर्ती ॥ मंद हो माझी मती ॥ २ ॥
करीन व्रत तुझें ॥ शरण आलो रे माझें ॥
नयन शीणले गा ॥ येइं येइं पांडुरंगा ॥३॥
दास हा लीन झाला ॥ अभिमानही बुजाला ॥
वैपरित्य नुरे कांहीं ॥ भक्त नमतसे पायीं॥४॥२०६॥

**आर्या.**

बहु दुःखें देतांही, सुर भक्ती करित हा कसा[1] दास ॥
येतांचि तो सदय प्रभु, देईना काय हांक सादासे[2]॥२०७॥
बहु या दीन स्तुतिला, परिसुनि तो दीननाथ गहिंवरला॥
मग तो नभीं[3] वदवाक्, तेणें हरलाचि शोक महिवरला[4]।२०८।

**श्लोक पृथ्वीछंद ( केकावली )**

त्वदीय तनुजा[5] आली त्यजुनि मत्प्रसादास ती॥
विलाप जलधींत[6] मी ह्मणुनि मग्न केली सती ॥
करूनि गमना गृहीं जरि प्रसाद सेवूनियें ॥
नभीं वदत देव तो पतिस देखिशी निश्चयें॥ २०९॥

---

१ कसोटीस येतांच. २ हांकेस. ३ आकाशांत. ४ पृथ्वीवरचा. ५ मुलगी. ६ समुद्र.

### ओवी.

ऐसी ऐकूनी आकाशवाणी॥हर्षित जाहले सर्व वाणी ॥
कन्या सत्वर प्रसाद सेवुनी॥सानंद मनीं पातली॥२१०॥
तंव पुनरपि उचंबळोनि समुद्र ॥ जामात निघाला बाहेर ॥
पूर्वींपेक्षां ही कांती सुंदर ॥ नयनीं सर्वत्र पाहती ॥२११॥

### साकी.

गृहीं जाउनी प्रसाद सेवुनि, येतां पति अवलोकी ॥
मुखीं अंगुली घालुनियां जन वदाति नवल नव लोकीं ॥
वर्णूं काय कथा ॥ उपमा नाहीं सत्यव्रता ॥ धृ॥२१२॥
ईश स्तुतितें लोक करूनि मग करिती गृहगमनातें ॥
अनुपमेय आनंद जाहला सर्वांच्या सुमनातें॥२१३॥

### अभंग चारचरणी.

आनंद जाहला ॥ तेथें सर्वत्रांला ॥
भक्तांला पावला ॥ सत्यदेव ॥ २१४ ॥
द्रव्यच्छुला जैसा ॥ परास लाधला ॥
मग काय त्याला ॥ न्यून सांग ॥ २१५ ॥
जन्मांधासी प्राप्त ॥ झाले दिव्य नेत्र ॥
वंध्येला सुपुत्र ॥ होतां जैसा ॥२१६ ॥
हरणीचें पाडस ॥ चुकोनीया गेलें ॥
अवचित लाधलें ॥ शोधूं जातां ॥ २१७ ॥
ऐशा या आनंदा ॥ नाहीं हो ऊपमा ॥
वर्णनाचा सीमा ॥ झाली सारी ॥ २१८ ॥
बाळकृष्ण ह्मणे ॥ देव करी सारें ॥
वंदावे आदरें ॥ पाय त्याचे ॥ २१९ ॥

### आर्या.

साधूनें सर्व जना, पाचारुनि आणिलें स्वसदनातें ॥

सर्वांच्या तत्समयीं, दिसली आनंदपूर्ति वदनातें ॥ २२० ॥
व्रत केलें पुनरपि तें हर्षविलें देउनी प्रसाद जना ॥
बोले साधू यापरि, कधिंही आनंद जाहला मज ना ॥ २२१ ॥

### ओव्या.

सर्वत्र गेले स्वगृहा प्रती ॥ अत्याश्चर्य मानसीं करिती ॥
ह्मणती करितां ईशभक्ती ॥ उणें कांहीं नसेची ॥ २२२ ॥
साधू सहकुटुंब उपरांत ॥ येतां पौर्णिमा संक्रांत ॥
नित्य पर्वणी दिवसांत ॥ आचरी व्रत सत्याचें ॥ २२३ ॥
तया व्रताच्या नियोगें ॥ इहलोकीं अनुपम सौख्यभोगी ॥
अंतीं इच्छिती जें पदयोगी ॥ तें सत्यपुरीं लाधलें ॥ २२४ ॥
सहकुटुंब साधू करी भक्ती ॥ ऐसी जे नरही आचारिती ॥
तया इहलोकीं सुख प्राप्ती ॥ सत्यपुर अंतीं लाधतें ॥ २२५ ॥

### आर्या पंचक.

#### प्रार्थना.

प्रथम प्रसंग माझा, त्यांतहि जडधी न फार अभ्यास ॥
यास्तव पद्य रचाया, भ्यालों दूषण भयेंचि सभ्यांस ॥ १ ॥
परि पुनरपि मन्मनिं ये, सज्जन हित कथिति निश्चयें विहित ॥
बालक चुकतां माता, न धरूनि कोपास कथिति जेंवि हित ॥ २ ॥
ऐसें जाणुनि कथिलें, साधुचरित्रास मी यथा मतिनें ॥
श्री परमेश कृपेनें, झालें संपूर्ण आजि या रितिनें ॥ ३ ॥
काढोत दोष किंवा, भूषण देवोत सत्य मत्कृतिला ॥
परि पाहोतचि सज्जन, कुतर्कें या पद्यशा चमत्कृतिला ॥ ४ ॥
बहु भीत भीत आलों, योग्य तुह्मां पुढति यावयास न मी ॥
मज अङ्गिरा वा द्या, आश्रय तुमचा सदा पदास नमी ॥ ५ ॥

बा० दि० वैद्य कंनडकर पु० कर्ते.

## ॥ †आरती श्री सत्यनारायणाची ॥

जयदेवा सत्येशा नारायण मूर्ती ॥ भावें वंदन[1] करुनी करितों मी आरती ॥ धृ०॥ कलियुगिं जन अति दुःखित झाले भवतापें[2] ॥ त्यांचे दुःख हराया नाशाया पापें ॥ देवर्षी[3] त्वत्सन्निध येउनि तव कीर्ती ॥ वर्णन करितां केली तध्धेतू-पूर्ती ॥ जय०॥ १ ॥ कश्चित् काशीपुरीं निर्धन द्विज होता विप्ररूपातें धरुनी कथिलें त्वद्वृत्ता॥ जाउनि स्वगृहिं ब्राह्मण तव व्रत आचरितां ॥ अति धन–धान्या मिळुनी हरली तच्चिंता ॥ जय० ॥२॥ विप्रा पासुनि काष्ठै[4]केत्या व्रत कळलें सुंदर व्रत पाहुनियां तन्मन ही वळलें ॥ तेणें द्विगुणित धन त्या काष्ठांचें आलें ॥ करितां व्रत सुख देउनि मोक्ष पदां नेलें ॥ जय०॥ ३ ॥ साधू–भक्ती पाहुनि संतानहि देशी ॥ पूर्ण मनोरथ करुनी महिमा दावीशी ॥ अद्भुत माया देवा दावुनि वणिजांसी ॥ व्रत आचरितां अंतीं सत्यपुरीं नेसी ॥ जय० ॥ ४ ॥ प्रसाद देती गोपहि करुनी तव पूजा ॥ न स्वीकारी त्यातें अंगध्वज राजा ॥ प्रताप दावुनि लाविसि भक्तीच्या काजा ॥ अंतीं दिधली आज्ञा सत्य पुरीला जा ॥ जय० ॥ ५ ॥ अति दुस्तर भवसागर ते नरही तरती ॥ जे तव सुख कर–चरणा नित्य मनीं स्मरती ॥ देवा तव भजनानें ताप त्रय हरती ॥ दिनकर–सुत पद–कमलां आठवितो चित्तीं ॥ जयदेवा० ॥ ६ ॥

---

† ही आरती दाक्षिणा प्राइज कमेटीस जी प्रत पाठविली होती त्यांत नाहीं; नवी आहे.

१ नमस्कार. २ संसार दुःखानें. ३ नारद. ४ लांकडें विकणारा.

## चित्तवेधक साधुचरित्र.

यांत आर्या, श्लोक, साकी, दिंडी, पद, कटि ओवी, व गीतें इत्यादि प्रकारचीं प्राकृत पद्यें आहेत. ह्या कथेंत शोकरस प्रधान असून प्रसंगी आनंद, परमेश्वराची अघटित करणी व त्याचें भक्तवात्सल्य, आपत्कालीं सद्वर्तन रक्षिल्याचें फल, पातिव्रत्य धर्माची योग्यता इत्यादि गोष्टी दर्शविल्या आहेत. ह्या पुस्तकाबद्दल दक्षिणा प्राईज कमेटी कडून मजला इनाम मिळालें आहे. हें पुस्तक खालीं सही करणाराकडे अगर रा० महादेव गोपाळ पटवर्धन, क्लार्क, जनरल ट्राफिक म्यानेजर जी. ऐ. पी. रेलवे, मुंबई, बोरीबंदर, यांजकडे मिळेल.

किंमत आणे ६ व डाक हाशील ०– एक आणा.

बाळकृष्ण दिनकर वैद्य, कंनडकर.

कल्याण, कारलेकराचा वाडा ग्रंथकर्ते

---

## स्त्रीगीतसंग्रह. भाग १.

या नांवाच्या पुस्तकाचे मी सहाभाग तयार करून पैकीं पहिला भाग तूर्त छापविला आहे. यांत स्त्रियांच्या म्हणण्यांत येणारीं प्रसिद्ध व मनोरंजक अशीं देवादिकांच्या कथेचीं व कित्येक वेदांत विषयावर व कित्येक देहावर अशीं गाणीं असुन शेवटीं चित्तरंजनार्थ उखाणें आहेत. प्रत्येक गाण्याचा भावार्थ व कठीण शब्दांवर टीपा दिल्या आहेत. किंमत आणे ७ व डांकहाशील १ आणा.

महादेव गोपाळ पटवर्धन,

क्लार्क निसबत जनरल ट्राफिक म्यानेजर,

जी. ऐ. पी. रेलवे, मुंबई, बोरीबंदर.